## परिशिष्ठ पहिले

पथ प्रकल्प

१

अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थी-शिक्षकांचे

पाठनियोजनाच्या वेळचे प्रकट विचार.

संध्या फेंड्रे
इतिहास ९ वी
औद्योगिक क्रांती

विद्यार्थ्यांना, मोर्चे का काढले जातात हे माहित आहे / [१०] विद्यार्थ्यांना उपोषणे कां करतात हे माहित आहे आणि हे सर्व पुर्वज्ञान माहित आहे म्हणून मी पुढचे प्रश्न विचारत आहे /[१०] तर कधी कधी मोर्चे का काढले जातात ? / [९] जर अन्याय होत असेल तर / [९] कधी कधी लोक उपोषणे कां करतात ? / [६] तर आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी लोक उपोषणे करतात / [१] अन्याय होत असेल तर मोर्चे काढले जातात आणि मागण्या पूर्ण होण्यासाठी लोक उपोषणे करतात हे तुम्हाला माहित आहे / [१] तर आज मानवाने बदलत्या जिवनाबरोबर आपल्या गरजा भागविण्यासाठी नविन साधनांचा शोध लावून औद्योगिक क्रांती कशी केली ते पाहू / [१] पूर्वीच्या काळी माणून रानटी अवस्थेप्रमाणे रहात होता / [२] त्याचे जीवन चालविण्याचे एक साधन म्हणजे शेती होती पण ही शेती करण्यासाठी ते लाकडी नांगराचा वापर करीत / [२] पण जस जसे मानवाचे जीवन बदलत गेले त्या प्रमाणे मानवाच्या गरजाही बदलत गेल्या आणि या गरजा भागवून त्यांनी नवीन नवीन शोध लावले / [२] तर या नविन शोधा बरोबरच उत्पादन साधनांत व उत्पादन पध्दतीत अतिशय वेगाने बदल झाला आणि अशा प्रकारच्या क्रांतीकारक बदलास औद्योगिक क्रांती असे म्हणतात / [२] हा औद्योगिक क्रांतीचा अर्थ आहे [redacted] हे मुलांना समजावे यासाठी मी औद्योगिक क्रांतीचा अर्थ समजावून सांगितला ते माझे उद्दीष्ट आहे / [१०] तुम्ही आता पाहिलेच असेल की, शेती करताना नांगर वापरतात / [१] तर हे नांगर कशाचे असू शकतील/ [५] हे नांगर लाकडाचे असतात / [९] हे लाकडाचे नांगर ओढणे-

साठी बैलांचा उपयोग करतात / [२] आता कांही शेतीत तुम्ही पाहिले असेल की हे लाकडाचे नांगर जाऊन तेथे ट्रॅक्टरचा उपयोग केलेला असतो / [१] मग आता हा ट्रॅक्टरचा वापर कसा आला ? तर आता यंत्रयुग आलेले आहे आणि यंत्राचा वापर केल्यामुळे उत्पादनात मोठया प्रमाणांत वाढ होते / [२] याच्यासाठी वेळ पण कमी लागतो. वेळेची बचत होते आणि आपल्या शक्तीचीही बचत होते व उत्पादनही मोठया प्रमाणांवर होते / [२]. आणि याचाच आपल्याला शेतीस मोठया प्रमाणांत उपयोग होतो / [२] आता आपण औद्योगिक क्रांतीचा अर्थ पाहिला तर आता या औद्योगिक क्रांतीला चालना देणारे घटक पाहू / [१] तर औद्योगिक क्रांतीला चालना देणारे घटक वस्तूची मागणी, वाढता व्यापार, नविन नविन बाजारपेठा, उत्पादन पध्दतीत बदल करण्याची गरज, शोध, यंत्र निर्मिती, यंत्र निर्मितीस लागणारे भांडवल / [२] म्हणजेच जर आपण वस्तू बनविलेले असते तिला मागणी आली पाहिजे आणि जर मागणी वाढत असेल तर त्या वस्तूचे मोठया प्रमाणांवर उत्पादन होईल / [२] आणि ही मागणी वाढविण्यासाठी नविन नविन बाजारपेठा हव्यांत आणि ह्या वस्तूची मागणी मोठया प्रमाणांवर व्हायला हवी / [२] तर त्याला यंत्र सामुग्रीही नविन पध्दतीची पाहिजे आणि ही यंत्र निर्मिती करण्यासाठी भांडवल आवश्यक आहे. भांडवला शिवाय कच्चा माल ही मोठया प्रमाणांत मिळायला पाहिजे / [२] हे जर घटके मोठया प्रमाणांवर उपलब्ध असतील तर वस्तूची मागणी मोठया प्रमाणांत होऊन उत्पादन होते आणि औद्योगिक क्रांतीला चालना मिळते / [२] औद्योगिक क्रांतीला चालना देणारे घटक हा मुद्दा समजणे, समजावून विद्यार्थ्यांना घेणे हे माझे उद्दीष्ट हो / [१०] तर आता आपण औद्योगि क्रांतीला चालना देणारे घटक पाहिले तर ही

औद्योगिक क्रांती झपाट्याने प्रथम कोठे झाली ते पाहू / [१] इंग्लंड मध्येच औद्योगिक क्रांती झपाट्याने झाली कारण इंग्लंड हे राष्ट्र व्यापारात अग्रेसर होते /[२] आणि इंग्लंडमध्येच सातत्याने नविन बाजारपेठांचे शोध, वस्तुचे उत्पादन करणे व उत्पादनासाठी नविन नविन यंत्रांचा शोध घेऊन मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून ते बाहेरच्या देशांत पाठविणे हे सर्व इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणांवर होत होते / [२] या शिवाय इंग्लंडमध्ये यासाठी लागणारे भांडवल मोठ्या प्रमाणांवर भांडवल संचय ही भांडवल संचय जोरांत होत होते म्हणून इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झपाट्याने झाली / [२] इंग्रजाने आपले उत्पादन वाढवून ते बाजारपेठ पहाण्यासाठी भारत व अफ्रिका या देशांत आले / [२] व त्याने व्यापार-याच्या निमित्ताने भारत व अफ्रिका देशांत आपले पाय रोवले / [२] तर इंग्रजाने भारत व इतर देशांत व्यापाराच्या निमित्ताने आले व औद्योगिक क्रांतीसाठी भांडवल कशा प्रकारे जमा केले ते आज आपण पाहू / [१] मी आपल्याला औद्योगिक क्रांतीला भांडवल कशा प्रकारे गोळा केले व त्याने कोणत्या प्रकारे प्रयत्न केले हे मुलांना समजावे हे माझे उद्दीष्ट राहील / [१०] त्या काळी इंग्लंडमध्ये लोकरीचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणांवर चालत असे. परंतू हा हस्त व्यवसाय होता. कारण कारागीर आपल्या घरी असून हे काम करीत / [२] नंतर थोडे थोडे कारागीर एकत्र येऊन हे काम करीत पण अशाच प्रकारे हे घरगुती व्यवसायावर आणि मनुष्य शक्तीवर चालत असे / [२] पण बाजारपेठेतील वाढती मागणी पाहून इंग्रजांनी इंग्रज व्यापा-यांनी कांही कारागीर एकत्र आणले आणि त्यांना कच्चा माल व उत्पादनांची साधने देऊन मोठ्या प्रमाणांवर उत्पादन सुरु केले / [२] आणि हे उत्पादन श्रम विभागणीवर झाले आणि श्रम विभागणी मुळे कामाचे स्वरूप व वेग वाढला आणि त्यामुळे उत्पादनांत अतिशय वेगाने वाढ झाली / [२] आणि उत्पादनांत वाढ झाल्यामुळे

भांडवल मोठ्या प्रमाणांत जमू लागले / [२] त्याच प्रमाणे इंग्लंडचा जगभर चाललेल्या साम्राज्य विस्तार आणि या साम्राज्य विस्ताराच्या जोरावरच इंग्लंडने संपत्ती मिळविण्यास सुरुवात केली / [२] उदा. पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी ईस्ट इंडीया कंपनीने भारतातून ब्रिटीश खजिन्यांत लक्षावधी रुपये भरायला सुरुवात केली / . [२] अशा प्रकारे इंग्लंडमध्ये दोन मार्गांनी भांडवल संचय जोरात होऊ लागला / [२] आता आपण औद्योगिक क्रांतीसाठी भांडवल कशा-प्रकारे जमा झाले हे पाहिले / [४] त्याच प्रमाणे या औद्योगिक क्रांती-साठी यंत्र निर्मिती सुद्धा आवश्यक आहे / [२] तर इंग्लंडमध्ये यंत्र निर्मिती कशाप्रकारे झाली ते पाहू / [५] यंत्र निर्मिती कशी झाली हे विद्यार्थ्यांना समजावून देणे हे माझे उद्दीष्ट राहील / [१०] तर यंत्र निर्मितीसाठी लोखंड आणि कोळसा हे मोठ्या प्रमाणांत मिळणे आवश्यक आहे / [२] इंग्लंड मध्ये पश्चिम व उत्तर भागात लोखंड व कोळसा यांच्या विपूल खाणी असल्याने ते उत्तेजनक ठरले / [२] आणि इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला चालना देणारे नैसर्गिक घटक सुद्धा मोठ्या प्रमाणांत अनुकूल ठरले / [२] विद्यार्थ्यांना इंग्लंडचा पश्चिम व उत्तर भाग नकाशामध्ये दाखविणार आहे / [८] कारण जगाचा नकाशा पहातांना विद्यार्थ्यांना इंग्लंडचा पश्चिम व उत्तर भाग निश्चितपणे समजावा आणि त्यांना आपण नकाशा वाचत असतांना तो भाग समजावा यासाठी नकाशामध्ये इंग्लंडचा पश्चिम व उत्तर भाग दाखविणार आहे / [१०] इंग्लंडमधील लोकरीच्या कपड्याला इतर देशांतून मोठ्या प्रमाणावर मागण्या येऊ लागल्याने त्यामुळे व्यापारी, इंग्लंड मधील व्यापारी, मोठ्या प्रमाणांवर उत्पादन करू लागले / [२] आणि हे उत्पादन करतांना त्यांनी इतर कच्चा माल कारखान्यांना पुरवू लागले / [२] आणि कारखान्यांत कच्चा माल पुरवित असतांना त्यांनी मोठ्या प्रमाणांवर कुरणे काढायला सुरुवात केली / [२] आणि ही कुरणे तयार करीत असतांना

जो शेतकरी होते. त्यांच्याकडून लहान शेतक-यांकडून जमिनी घेतल्या व मेंढयासाठी मोठया प्रमाणावर कुरणे तयार केली / [२] या लोकांनी शेतक-यांकडून कुरणे काढून घेऊन त्यात आपण कुरणे वाढवून त्यांनी मेंढयाची लोकर मोठया प्रमाणात वाढविली /[२] ही लोकर त्यांनी स्वत: मिळवत इतर फॅक्टरींना ते पुरवू लागले / [२] आणि या फॅक्टरींना पुरविल्याने लोकरीचे उत्पादन मोठया प्रमाणावर होऊ लागले / [२] अशतिश त्या शेतक-यांकडून या लोकांनी जमिनी काढून घेतल्यामुळे या लोकांवर बेकारी आली /[२] आणि ही बेकारी आल्यामुळे कामगार म्हणून काम मिळविण्या - साठी लोक शहरांकडे धावले / [२] आणि यंत्रावरील काम करायला त्यांनी सुरुवात केली / [२] म्हणजेच या कारखानदार लोकांना स्वस्त दरांत कामगार म्हणून हे लोक उपलब्ध झाले / [२] इंग्लंड मध्ये सुत काढायला अनुकूल असे हवामान का आहे ? / [१] इंग्लंड हे एक बेट आहे आणि त्याच्या चारही बाजूनी ते समुद्राने वेढलेले असल्याने तेथील हवामान सूत गिरण्यांना इंग्लंड मध्ये उपलब्ध होऊ लागले व असे अनुकूल हवामान / [२] असल्याने हळू हळू इंग्लंडमध्ये सुत गिरण्या निघू लागल्या व त्याचे प्रमाण वाढू लागले व त्या - साठी यंत्र निर्मितीसुध्दा इंग्लंडमध्ये होऊ लागली / [२] आणि त्यामुळे ते इंग्लंडमध्ये एक एक कारखाने मिळून औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली / [२] तर आज आपण औद्योगिक क्रांतीचा अर्थ, औद्योगिक क्रांतीला चालना देणारे घटक, भांडवल, यंत्र सामुग्री, मनुष्यबळ हे सर्व आज आपण पाहिलेले आहे / [७] तर आता आपण विद्यार्थ्यांना शिकविलेला भाग कितपत समजला हे पहाण्या- साठी संकलनावरचे प्रश्न विचारणार आहे / [७] मानवाने उत्पा- दनाची साधने कशासाठी तयार केली ? /[७] औद्योगिक क्रांती म्हणजे काय ? / [७] औद्योगिक क्रांतीला सुरुवात प्रथम कोठे झाली ? / [७] इंग्लंडमध्ये कोणत्या दोन मार्गांनी भांडवल

गोळा झाले / [७] कारखानदारांना स्वस्त दरांत कामगार का उपलब्ध झाले / [७] आता मी स्वाध्याय देणार आहे " भारता मध्ये औद्योगिक क्रांती होण्यास विसावे शतक उजाडले। " याची कारणे दहा ते बारा ओळीत लिहा / [७] तर हा स्वाध्याय देण्या मागचा माझा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांनि इंग्लंडमध्ये प्रथम औद्योगिक क्रांती झाली आणि भारतामध्ये औद्योगिक क्रांती होण्यास विसावे शतक उजाडले याच्या मागची कारणे विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन करुन शोधून काढून ती लिहावीत यासाठी मी हा स्वाध्याय दिला आहे / [१० ].

डवर संजय आनंदा
इयत्ता ६ वी
मराठी
आत्मचरित्रपर वर्णन

विद्यार्थी आपल्याला माहित असलेले आत्मचरित्र म्हणजे काय हे सांगतो / [१] विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासण्यासाठी मी काही प्रश्न विचारणार आहे / [१] महाराष्ट्रात कोणते - कोणते राजकीय नेते होऊन गेले ? / [५] त्यांनी नांवे विद्यार्थी सांगतो / [९] सुधाकरराव नाईक, शरद पवार, चित्रा नाईक, वसंतरावजी नाईक इत्यादी / [१] त्याचप्रमाणे आत्मचरित्रे कोणी कोणी लिहीली हे ही सांगतो / [५] म. गांधींचे माझे सत्याचे प्रयोग, इंदिरा गांधी - माझे आठवणींचे दिवस / [९] तसेच आज आपण यशवंतरावजी चव्हाण यांचे कृष्णाकाठ या आत्मचरित्राची माहिती स्पष्ट पहात आहोत / [१] आता आपण लेखकाचा परिचय पाहणार आहोत / [२] लेखकाचे पूर्ण नांव आहे यशवंतराव बळवंतराव चव्हाण / [२] यांचा जन्म १९२४ साली झाला ते एक थोर राजकीय नेते होते / [२] भारतीय स्वातंत्र्य लढयात त्यांनी फार मोठा मोलाचा वाटा उचललेला आहे / [२] महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी त्याचप्रमाणे भारताचे संरक्षण मंत्री म्हणूनही त्यांनी कार्यभार पाहिला आहे / [२] राजकारणांत राहून ही त्यांना साहित्या विषयी प्रेम व आपुलकी आहे / [२] " सह्याद्रीचे वारे " व " युगांतर " ही त्यांची भाषणाची पुस्तके आहेत / [२] " कृष्णाकाठ " हे त्यांचे आत्मचरित्र पर धडा यांचे ४ परिच्छेदामध्ये आपण माहिती पहाणार आहोत व प्रकट वाचन करणार आहोत/[२] प्रकट वाचन कां करावे ? / [१०] प्रकट वाचन करण्यामागचा

उद्देश म्हणजे मराठी भाषा कशी वाचावी या संबंधीची माहिती देणे. त्याच प्रमाणे शिक्षकाचे हावभाव, आवाजातील चढ-उतार हे प्रकट वाचन करतांना कसे असावे याबद्दल माहिती देणे / [२] त्याच प्रमाणे धड्याचा सारांश समजण्यासाठी प्रकट वाचन करावे / [१०]

हा सहावीचा वर्ग असल्याने प्रकट वाचनासाठी १० मिनीटे लागणार आहेत./ [२] माणूस आपले स्वतःचे असे एखादे कार्यक्षेत्र निवडतो. त्यामध्ये तो संपूर्ण आयुष्य घालवितो / [ ] माणूस आपले या धकाधकीच्या जीवनांतून त्याला थोडासा विसावा मिळावयचा असतो त्यासाठी त्याला विरंगुळा हवा असतो / [ ] अशाच प्रकारे यशवंतरावजी चव्हाणांनी आपला विरंगुळा स्पष्ट केला आहे / [ ] यशवंतरावजी चव्हाण सांगतात की ज्यावेळी मी माझ्या जिवनाकडे पहातो त्यावेळी मला असे दिसते की / [ ] ज्या ठिकाणी मी खेळलो, बागडलो ज्या कऱ्हाडच्या प्रिती संगमावर खेळलो, मी मित्रां समवेत खेळलो त्याची मला आठवण आली /·[ ] मी माझ्या आई कुटुंबिय च्यापातून कऱ्हाडच्या प्रिती संगमावर गेलो. त्यावेळी मला माझ्या बाल्यपणाचे दिवस आठवले / [ ] मी माझ्या आई कुटुंबिय आणि भाव समवेत गप्पा गोष्टी मारुन माझा विरंगुळा मी प्रकट करीत असतो /[ ] ज्यावेळी मी घरामध्ये बहिण भावंडामध्ये बोलत असतो, खेळत असतो त्यावेळी मी कितीही थकलेला असलो तरी माझे मन उल्हासित होत असते / [ ] लहानपणी शाळेत असतांना किंवा तरुणपणी राजकारण करत असतांना देखील ज्यावेळी माझ्या डोक्यांत कल्पना सुचत किंवा काव्ये सुचत त्यावेळी त्या ओळी मी माझ्या वहिवर उतरुन घेत असे / [ ] अशाच प्रकारे " मॅक्झीम गार्की " यांची " आई " ही कादंबरी वाचल्यावर

माझ्या पोटात कालवाकालव झाली / [ ] त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरां-सारखं महान काव्य, ज्ञानेश्वरांसारखा महान कवि देखील मी वाचलेला आहे. वेरुळ येथील कैलास लेणी ज्यावेळी प्रथम पाहिली त्यावेळी माझे मन आनंदित झाले / [ ] जे लोक मला कैलास लेणी विषयी सांगत होते त्यांचे मी तर पुरे अस्तित्त्वच विसरून गेलो होतो /[ ] साहित्याची गोडी माणूस एकांतात चाखत असतो. परंतु ज्यावेळी समुदायात बसून कुस्त्यांच्या दंगली पहाणे, क्रिकेटचे खेळ पहाणे, तमाशा पहाणे या सारख्या प्रसंगी मी माझ्या स्वतःलाच विसरून जात असतो/ [ ] बालगंधर्वांची जुनी गाणी आठवल्यानंतर एका नव्या जगात प्रवेश करत आहे असे माझ्या मनाला वाटत आहे /[ ] केशव दाते सारख्यांचे नाटक पाहून माझ्या मनातील मराठी माणूस जागा होतो / [ ] अशा प्रकारे त्यांनी आपला " विरंगुळा " या पाठामध्ये रेखाटला आहे / [ ]

विरंगुळा सारखे दुसरे जीवन समृध्द, विरंगुळा हा माणसाच्या जीवनास सुखी आणि समृध्द करणारा क्षण आहे असे त्यांनी या पाठाद्वारे सांगितले आहे / [२] या पाठाचा सारांश मुलांना कितपत समजला आहे त्यासाठी मी मुलांना प्रश्न विचारणार आहे / [६] प्रिती संगमावर गेल्यावर यशवंतरावजी चव्हाणांना कोणकोणत्या आठवणी आल्या ?

हा प्रश्न विचारण्या मागचे कारण असे म्हणजे यशवंतरावजी लहानपणी कोणत्या प्रिती संगमावर खेळले ते कसे वागडले ते मित्रासमवेत त्यांचा त्या ठिकाणी कसा वेळ गेला ही उत्तरे मुले देतील, यांचे आकलन झाले आहे की, ते मला कळेल/[१०] यशवंतरावजी चव्हाणांचे उल्हासित मन केव्हा होते ? / [६]

ज्यावेळी यशवंतरावजी चव्हाण आपल्या कुटुंब समवेत म्हणजे आई भावंडे, मित्र, आप्त समवेत ज्या वेळी खेळतात त्यावेळी त्यांचे मन उल्हासित होते. अशा प्रकारचे उत्तरे विद्यार्थी देतील / [९] लेखकाचा पोटात विलक्षण कालवा कालव केंव्हा झाली / [६] या प्रश्नाचे उत्तर आकलन विद्यार्थ्यांना कितपत झाले हे मी पहाणार आहे / [१०] " मॅक्झीम गॉर्की " ची " आई " ही कादंबरी वाचल्यावर लेखकाच्या पोटात विलक्षण कालवा कालव झाली अशा प्रकारची अपेक्षित उत्तरे विद्यार्थी सांगतो / [९] लेखक आपले अस्तित्व केंव्हा विसरुन गेले ? / [६] या प्रश्नाचे आकलन होण्यासाठी, हा प्रश्न समजला आहे की ते समजण्यासाठी मी हा प्रश्न विचारत असे / [३] यशवंतरावजी चव्हाणांची स्मृती केंव्हा जागी होते / [६] बालगंधर्वांची जुनी गाणी ऐकल्यावर यशवंतरावांची स्मृती जागी होते की नाही याचे आकलन विद्यार्थ्यांना झाले की नाही यासाठी हा प्रश्न मी विचारला आहे / [१०] या पाठाचे समग्र ज्ञान विद्यार्थ्यांना कितपत साध्य झाले आहे हे पहाण्यासाठी मी संकलनात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारणार आहे / [१०] प्रिती संगमावर गेल्यावर लेखकाला कोणता अनुभव आला / [७] लेखकाचे मन उल्हासित केंव्हा झाले ? /[७] लेखकाच्या हृदयात विलक्षण कालवा-कालव केंव्हा झाली ? / [७] लेखकाला आपले अस्तित्व केंव्हा विसरुन गेला ? /[७] यशवंतरावजी चव्हाण यांच्या मनातील स्मृती केंव्हा जागृत झाली ? / [७] विद्यार्थ्यांना धड्याचे ज्ञान कितपत साध्य झाले आहे हे पहाण्यासाठी संकलनात प्रश्न विचारलेले आहेत / [७] यशवंतरावजी चव्हाण यांनी आपल्या बालपणीचे अनुभव आले ते सांगितले आहेत त्याच प्रकारे

तुम्हाला तुमच्या जीवनांत आतापर्यन्त जे अनुभव आले ते १० ते १५ ओळीत लिहा / [७] विद्यार्थ्यांची लेखन शैली विकसित व्हावी / [ ] त्यांना जे अनुभव आले आहेत ते त्यांनी योग्य भाषेत प्रकट करावेत / [१०] त्याच प्रमाणे त्यांच्या विचारांची क्षमता वाढ-विण्यासाठी हा स्वाध्याय दिला आहे / [१०].